## १०० टक्के उद्दिष्ट गाठत मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजना यशस्वी करा - आ.किशोर जोरगेवार

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.२३ :** चंद्रपूर विधानसभा मतदारसंघ पाणंद रस्त्यांनी युक्त करण्याचा आपला ठाम संकल्प असून मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकर्‍यांसाठी पायाभूत सुविधा सक्षम केल्या जाणार आहेत. मात्र या योजनेचा खरा लाभ शेतकर्‍यांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रशासनाने सर्व विभागांमध्ये समन्वय साधत १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी काटेकोर नियोजन करावे, असे निर्देश आमदार किशोर जोरगेवार यांनी दिल्या.मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात शुक्रवारी उपविभागीय कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद चौगुले, तहसिलदार विजय पवार, नायब तहसीलदार राजु धांडे, गट विकास अधिकारी संगीता भांगडे, वन परिक्षेत्र अधिकारी जि. आर नायगमकर, एस. व्ही मव्हेशंकर, उपकृषी अधिकारी व्ही. बी बुग्गेवार, महसुल अधिकारी व्ही.एम कुरेवार, के. टी मोडकवार, प्रविणकुमार वर्भे, विनोद गणफाडे, प्रकाश सुर्वे, भुकरमापक व्हि.डी राठोड, तलाठी, एस. एन दुर्गे, एस. आर नगराळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे के. एस आश्राम, यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले की, शेतकर्‍यांना थेट शेतापर्यंत पोहोचता यावे, शेतीमालाची वाहतूक सुलभ व्हावी आणि ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी पाणंद रस्ते अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यामुळे केवळ कागदावर नव्हे, तर प्रत्यक्षात दर्जेदार आणि उपयोगी रस्ते तयार झाले पाहिजेत, याकडे प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे.

# स्वतंत्र गट नोंदणीने सत्तास्थापनेचे समीकरण बिघडणार

### ◆शिवसेना (उबाठा) व वंचित गटाची आणि
### ◆जनविकास सेना व एआयएमआयएम गटाची नोंदणी

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.२३ :** महापालिकेतील सत्तास्थापनेच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उबाठा) व वंचित बहुजन आघाडीचा संयुक्त गट तसेच जनविकास सेना व एआयएमआयएमचा स्वतंत्र गट नोंदणी झाल्याने राजकीय समीकरणे पूर्णतः बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या नव्या गटनिर्मितीमुळे महापालिकेतील बहुमताची गणिते बिघडणार असून, सत्ता स्थापनेसाठी काँग्रेस व भाजपाला नव्याने डावपेच आखावे लागणार आहेत.

मनपा निवडणुकीत काँग्रेसला २७, भाजप २३, शिवसेना (उबाठा) ६, वंचित बहुजन आघाडी २, शिवसेना (शिंदे) १, अपक्ष २, एमआयएम १, बसपा १ असा कौल जनतेनी दिला.यामूळे कोणत्याची पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही.बहुमतासाठी ३४ संख्याबळाची आवश्यकता आहे.मात्र मित्र पक्षांनी स्वतंत्र गट केल्याने पेच वाढला आहे.

मनपा निवडणुकीत शिवसेना (उबाठा) व वंचित बहुजन आघाडी यांच्या गटाची अधिकृत नोंदणी झाली असून यांचेकडे ८ चे संख्याबळ आहे.तसेच जनविकास सेना व एआयएमआयएम यांची सुध्दा अधिकृत नोंदणी झाली असून यांचेकडे ४ चे संख्याबळ आहे.यामूळे या दोन्ही गटाचे महत्व वाढले आहे.

महापालिका निवडणुकीनंतर काँग्रेस व भाजपमध्येच मुख्य लढत रंगणार, असे चित्र असताना आता छोट्या पक्षांच्या गटनोंदणीमुळे परिस्थिती गुंतागुतीची झाली आहे. शिवसेना (उबाठा) व वंचित बहुजन आघाडीने एकत्र येत स्वतंत्र गट नोंदविल्याने त्यांचे संख्याबळ निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे जनविकास सेना आणि एआयएमआयएम यांनीही संयुक्त गटाची नोंदणी केल्याने सत्ता स्थापनेत 'किंगमेकर'ची भूमिका बजावण्याची संधी या गटांना मिळणार आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, या दोन्ही गटांकडे मर्यादित संख्याबळ असले तरी महापौर निवड आणि स्थायी समितीच्या रचनेत त्यांची मते निर्णायक ठरू शकतात. त्यामुळे काँग्रेस, भाजपसह अन्य प्रमुख पक्षांनी या गटांशी संपर्क वाढवण्यास सुरुवात केली आहे. भेटीगाठी, चर्चांच्या फेऱ्या आणि संभाव्य आघाड्यांवर राजकीय वर्तुळात जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत.

दरम्यान, शिवसेना (उबाठा) व वंचित आणि जनविकास सेना व एआयएमआयएम या गटांनी 'विकास व पारदर्शक कारभार' या मुद्द्यावर एकत्र येण्याची भूमिका मांडल्याचे समजते. मात्र अंतिम निर्णय सत्ता स्थापनेच्या वेळी कोणत्या बाजूला उभे राहतात, यावरच महापालिकेतील सत्तेचा किल्ला कोणाच्या हाती जाणार, हे ठरणार आहे.

एकूणच, गटनोंदणीच्या या नव्या हालचालींमुळे चंद्रपूर महापालिकेतील सत्तास्थापनेचे गणित अधिकच गुंतागुंतीचे बनले असून, येत्या काही दिवसांत राजकीय घडामोडी वेग घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### एकमतअभावी काँग्रेसच्या गटनेत्याची नोंदणी रखडली

महापालिकेतील काँग्रेस पक्षाच्या गटनेत्याच्या निवडीवरून सुरू असलेले अंतर्गत मतभेद आता थेट नोंदणी प्रक्रियेवर परिणाम करू लागले आहेत. दोन्ही प्रमुख गटांकडून गटनेता पदासाठी एकमत न झाल्याने काँग्रेसच्या गटनेत्याची अधिकृत नोंदणी रखडली आहे.महापालिकेत काँग्रेस सर्वाधिक नगरसेवकांसह प्रमुख पक्ष ठरला असला, तरी गटनेतृत्वाच्या प्रश्नावर पक्षात फूट पडल्याचे स्पष्ट झाले आहे. आ.विजय वडेट्टीवार गट आणि खासदार प्रतिभा धानोरकर गट यांच्यातील मतभेद अद्याप मिटलेले नाहीत. दोन्ही गट आपापल्या उमेदवारांच्या नावावर ठाम असल्याने सहमतीचा मार्ग निघत नाही.नियमानुसार गटनेत्याची नोंदणी ठराविक कालावधीत करणे आवश्यक असते. मात्र काँग्रेसकडून अद्याप अधिकृत नाव सादर न झाल्याने नागपूर विभागीय आयुक्ताकडे नोंदणी प्रक्रिया प्रलंबित आहे. याचा थेट परिणाम महापालिकेतील सत्तास्थापना, महापौर निवड आणि विविध समित्यांच्या रचनेवर होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### काँग्रेसच्या गटनेतृत्वावर दोन्ही गटांकडून एकमत नाही



महापालिकेतील काँग्रेस पक्षाच्या गटनेतृत्वाच्या निवडीवरून पक्षातील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा उफाळून आले आहेत. गटनेता पदासाठी काँग्रेसच्या दोन्ही प्रमुख गटांकडून अद्याप एकमत झालेले नसून, चर्चेच्या अनेक फेऱ्या होऊनही निर्णय प्रलंबित आहे.महापालिकेतील सत्ता स्थापनेसाठी गटनेत्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते. मात्र आ.विजय वडेट्टीवार गट आणि खासदार प्रतिभा धानोरकर गट यांच्यातील मतभेदांमुळे गटनेता कोण असावा, यावर सहमती होत नसल्याचे चित्र आहे. दोन्ही गटांकडून आपापल्या समर्थक नगरसेवकांचे नावे पुढे रेटले जात असून, पक्षांतर्गत रस्सीखेच तीव्र झाली आहे.मनपा निवडणुकीत काँग्रेसला २७ जागा मिळाल्या.यातील १५ नगरसेवकांचा एक गट आ.वडेट्टीवार यांचेकडे तर १२ नगरसेवकांचा एक गट खा.धानोरकर यांचेकडे सुरक्षित आहे.सूत्रांच्या माहितीनुसार, वरिष्ठ पातळीवर समेट घडवून आणण्यासाठी प्रदेश काँग्रेस नेतृत्वाकडून हालचाली सुरू आहेत. मात्र स्थानिक पातळीवरील वाद शमविणे आव्हानात्मक ठरत आहे. गटनेता निवडीला उशीर झाल्यास महापालिकेतील सत्ता स्थापनेच्या प्रक्रियेवरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.दरम्यान, भाजपसह इतर पक्ष या परिस्थितीकडे बारकाईने लक्ष ठेवून असून, काँग्रेसमधील अंतर्गत फूट त्यांच्या फायद्याची ठरू शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. काँग्रेस नेतृत्वाने वेळीच तोडगा काढला नाही, तर पक्षाची एकजूट आणि सत्तास्थापनेची गणिते दोन्ही धोक्यात येण्याची चिन्हे आहेत.

## जनविकास सेना व एआयएमआयएमने 'महानगर आघाडी' गटाची नोंदणी केली

### गटनेतेपदी पप्पू देशमुख यांची नियुक्ती



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.२३ :** महानगरपालिका निवडणुकीत वडगाव प्रभागातून निवडणूक जिंकलेले जनविकास सेनेचे नगरसेवक पप्पू देशमुख, मनिषा बोबडे व प्रतिक्षा येरगुडे तसेच एकोरी प्रभागातील एआयएमआयएमचे नगरसेवक अझहरुद्दीन शेख यांनी एकत्रित येऊन आज दिनांक २३ जानेवारी रोजी नवीन गटाची नोंदणी केली. नागपूर येथे विभागीय आयुक्त कार्यालयात महानगर आघाडी,चंद्रपूर नावाने या गटाची नोंदणी करण्यात आली.

विशेष म्हणजे जनविकास सेनेने काँग्रेस सोबत निवडणूकपूर्व युती करून तीन जागांवर विजय मिळवला होता. एआयएमआयएम ने एकोरी प्रभागातून एका जागेवर विजय मिळवला. महानगर आघाडी,चंद्रपूर या गटाचे संख्याबळ चार झालेले आहे. सत्ता स्थापन करण्यात या गटाची महत्त्वपूर्ण भूमिका राहणार आहे.

मात्र चंद्रपूर शहर महानगरपालिकेत स्वच्छ व पारदर्शक कारभार आणण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. 'काँग्रेस पक्षाने तशी हमी दिल्यास सत्ता स्थापन करण्यासाठी त्यांना निश्चितपणे पाठिंबा देऊ', या भूमिकेचा महानगर आघाडीचे गटनेते पप्पू देशमुख यांनी पुनरुच्चार केला.

## घुग्घुस येथे दोन दिवसीय भव्य धम्म संमेलन



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**घुग्घूस दि.२३ :** येथील बौद्ध सर्कल समिती व नवबौद्ध स्मारक तथा बहुउद्देशीय समितीतर्फे २६ व २७ जानेवारी रोजी बोधिसत्व, विश्वरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याच्या वर्धापन दिन व भारतीय संविधानाच्या रौप्य महोत्सव दिनानिमित्त दोन दिवसीय भव्य धम्म संमेलनाचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसर घुग्घुस येथे करण्यात आले आहे.

२६ जानेवारी रोजी सकाळी ११:३० वाजता प्रथम सत्रात धम्म संमेलनाचे उद्घाटन व धम्मदेशना द्वितीय सत्रात संविधानावर येणारे आव्हाने व त्यांचे घटनात्मक मार्गाने निराकरण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मातृ संघटनासाठी योगदान आणि आजची स्थिती व उपाय, बहुजन चळवळीचे समोरील आव्हाने व उपाय. मातोश्री रमाई यांचे एक अंकी नाटक 'मी रमाई बोलते'.

२७ जानेवारी रोजी सकाळी ११:३० वाजता प्रथम सत्रात उद्घाटक व प्रमुख पाहुण्यांचे आगमन, सत्कारमुर्ती प्रथम नगराध्यक्षा यांचा सत्कार व नवनियुक्त नगर सेवकांचा सत्कार. द्वितीय सत्रात डॉ. बाबासाहेबांनी महिलांना दिलेले अधिकार व आजच्या महिलांची स्थिती आणि उपाय, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धम्म चळवळ, बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रि मुक्ती व आजच्या काळाची परस्थिती.सायंकाळी ४ वाजता तिसऱ्या सत्रात कल्याणकारी राज्यांचा संकल्पनेला सत्ताधाऱ्यांचे आव्हान व उपाय, भारतीय संविधानाची निर्मिती आणि फुले, शाहु, आंबेडकरी विचार, संघर्ष व दिशा. २६ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता विनोदी सुप्रसिद्ध प्रबोधनकार याचा कार्यक्रम व २७ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता प्रख्यात प्रबोधनकार यांचा जल्लोष कार्यक्रम अश्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येत कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## बल्लारपूर नगर परिषद निवडणुकीत काँग्रेसचे घवघवीत यश विधिमंडळ पक्षनेते आ.वडेट्टीवारांमुळेच - काँग्रेस शहराध्यक्ष करीमभाई



**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**
**बल्लारपूर दि.२३ :** एकीकडे देशात व राज्यात भाजपची सत्ता असताना भाजपचे दिग्गज नेते आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या मतदारसंघातील बल्लारपूर नगर परिषद निवडणुकीत काँग्रेस पक्षाने नगराध्यक्ष पदासह १७ नगरसेवक निवडून आणण्यात जे घवघवीत यश संपादन केले व शहराच्या राजकारणात आपले वर्चस्व सिद्ध केले या दणदणीत विजयाचे श्रेय पूर्णतः विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार यांच्या सक्षम व जनतेशी नाळ जुळवणाऱ्या नेतृत्वाला जाते, असे स्पष्ट प्रतिपादन काँग्रेसचे शहराध्यक्ष करीमभाई यानी केले आहे.

निकाल जाहीर होताच काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या यश प्राप्तीनंतर बोलताना करीमभाई म्हणाले की, 'आ. विजय वडेट्टीवार यांनी निवडणूक प्रचारात बल्लारपूरच्या प्रत्येक प्रभागात प्रत्यक्ष संपर्क साधत नागरिकांच्या समस्या ऐकून घेतल्या. पाणी, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, रोजगार यांसारख्या ज्वलंत प्रश्नांवर त्यांनी ठाम भूमिका मांडली. त्यांच्या नेतृत्वावर जनतेने विश्वास टाकत काँग्रेसला भरघोस पाठिंबा दिला.'

भाजपच्या अपयशी व भ्रष्ट कारभाराला जनतेने या निवडणुकीत स्पष्ट नकार दिला असून काँग्रेसच्या विकासाभिमुख धोरणांना कौल दिल्याचे करीमभाई यांनी सांगितले. 'नगर परिषद ही सामान्य नागरिकांच्या सेवेसाठी असते, हे काँग्रेसने कृतीतून दाखवून दिले आहे. आ. वडेट्टीवार यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही जनतेच्या प्रत्येक प्रश्नासाठी रस्त्यावर उतरून लढा दिला आणि त्याचेच हे यश आहे,' असेही ते म्हणाले.या निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवारांनी संघटितपणे प्रचार करत घरोघरी जाऊन पक्षाची भूमिका मांडली. कार्यकर्त्यांची मेहनत, शहर नेतृत्वाची एकजूट आणि आ. विजय वडेट्टीवार यांचे प्रभावी नेतृत्व यामुळेच हा ऐतिहासिक विजय शक्य झाला, असे मत अनेक कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.या विजयामुळे बल्लारपूर नगर परिषदेत काँग्रेसची भक्कम सत्ता स्थापन झाली असून आगामी काळात शहराच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिले जाईल, असा विश्वास करीमभाई यांनी व्यक्त केला. 'जनतेने दिलेला विश्वास आम्ही विकासकामांच्या माध्यमातून सार्थ ठरवू. बल्लारपूरला स्वच्छ, सुंदर आणि विकासाच्या मार्गावर नेण्यासाठी काँग्रेस कटिबद्ध आहे,' असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.एकूणच बल्लारपूर नगर परिषद निवडणुकीतील काँग्रेसचे घवघवीत यश हे आ. विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वाची ठोस पावती ठरली असून शहरातील राजकारणात नव्या पर्वाची सुरुवात झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

## वनपर्यटन जोगापूर क्षेत्रात विद्यार्थ्यांनी केले पक्षी निरीक्षण



**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**
**राजुरा दि.२३ :** वनपरिक्षेत्र राजुरा अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांकरीता पक्षी निरीक्षण व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मंगेश गिरडकर, उपविभागीय वन अधिकारी यांच्या मार्गदर्शनात गजानन इंगळे, वन परिक्षेत्र अधिकारी राजुरा यांच्या नेतृत्वात सदर पक्षी निरीक्षण व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी मार्गदर्शक म्हणून वनविभागाचे परिवेक्षाधीन वन परिक्षेत्र अधिकारी अविनाश शिवराज पाटील, एस. जी. गरमडे, क्षेत्र सहाय्यक, राजुरा, पी. ए. मंदुलवार, नियत वनरक्षक राजुरा यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आदर्श मराठी प्राथमिक विद्यामंदिर तथा आदर्श हायस्कूल राजुरा येथील राष्ट्रीय हरित सेना विभागाचे विद्यार्थी या पक्षी निरीक्षणात सहभागी झाले होते. जोगापूर वनपर्यटन क्षेत्र, नियतक्षेत्र जोगापूर कक्ष क्रमांक १७१, नियतक्षेत्र शिरसी कक्ष क्रमांक १७६ येथे सकाळी ६ ते १० वाजेपर्यंत हा पक्षी निरीक्षण व मार्गदर्शनाचा कार्यक्रम राबविण्यात आला. मार्गदर्शकांनी जोगापूर तलावाच्या परिसरात आढळणारे पक्षी, प्राणी, साप, वृक्ष यांच्याबद्दल माहिती दिली. दुर्बीण च्या सहाय्याने प्रत्यक्ष पक्षी निरीक्षणात विद्यार्थी रमून गेले होते. पौंड हेरॉन , टिटवी , हरियाल , बगडा , कवडी, पोपट व विविध पक्षांचे निरीक्षण व माहिती घेण्यात आली. पाण्यात, जमिनीवर आणि आकाशात उंच उडणारे पक्षी असे विविध प्रजातीच्या पक्षांची माहिती देण्यात आली. यावेळी राष्ट्रीय हरित सेना विभाग प्रमुख बादल बेले, वर्गशिक्षिका वैशाली चिमुरकर , निखिल खोब्रागडे, वनमजूर आदींची उपस्थिती होती. वनपरिक्षेत्र कार्यालय राजुरा मार्फत पक्षी निरीक्षण व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन केल्याने विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीव, पर्यावरण संवर्धन व निसर्गाप्रती आपुलकी निर्माण होईल.

## ३० जानेवारी रोजी प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.२३ :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत जिल्ह्यातील जास्तीत जास्त उमेदवारांना नोकरीची संधी उपलब्ध व्हावी, या हेतूने आठवडयाच्या प्रत्येक शुक्रवारी प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित करण्याचा उपक्रम ठरविण्यात आला आहे. या अनुषंगाने ३० जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय भवन चंद्रपूर येथे प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजीत करण्यात येत आहे

जिल्ह्यातील १० वी, १२ वी, आय.टी.आय. पदविका, पदवी इत्यादी उमेदवारांना विविध क्षेत्रात निर्माण होत असलेल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने, जिल्ह्यातील नामांकीत उद्योजकांचा थेट नोकरी इच्छुक उमेदवारांशी संपर्क करण्याच्या हेतूने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. मेळाव्याकरीता उमेदवारांनी आधारकार्ड व शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्राचे तसेच रिझ्यूमच्या प्रतीसह (कमीत कमी तीन प्रती) उपस्थित राहावे.

# मतदान प्रक्रियेत सहभागी होणे हे लोकशाहीचे पहिले मुल्य - डॉ.व्यवहारे

### १६ वा राष्ट्रीय मतदार दिन साजरा



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.२३ :** भारतीय स्वातंत्र्यापासूनच आपल्याला मतदानाचा अधिकार मिळाला आहे. आपल्या लोकशाहीची मूल्ये बालपणापासूनच आपल्या मनामध्ये रुजली पाहिजे. आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे भवितव्य ठरविणार आहे, त्यामुळेच राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विद्यार्थ्यांना येथे आमंत्रित करण्यात आले आहे. १७ व्या वर्षी आपण मतदार नोंदणी करू शकतो व १८ वर्षे पूर्ण झाल्यावर मतदानासाठी पात्र ठरतो. कारण मतदान प्रक्रियेत सहभागी होणे हे लोकशाहीचे पहिले मुल्य आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे यानी केले.

२५ जानेवारी रोजी शासकीय सुट्टी आल्यामुळे केंद्रीय निवडणूक आयोगाने २३ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदान दिन साजरा करण्याचे निर्देश दिले. त्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाच्या वतीने नियोजन भवन येथे आयोजित कार्यक्रमात डॉ. व्यवहारे बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) शुभम दांडेकर, जिल्हा पुरवठा अधिकारी राहुल बहादुरकर, जिल्हा माहिती अधिकारी राजेश येसनकर, चंद्रपूरचे तहसीलदार विजय पवार, तहसीलदार (सामान्य) प्रिया कवळे आदी उपस्थित होते.

निवासी उपजिल्हाधिकारी कुंभार म्हणाले, संपूर्ण भारतात आज राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात येत आहे. निवडणुकांमध्ये मतदार हा सर्वात महत्वाचा असल्यामुळे मतदार नोंदणी करणे आवश्यक आहे. भारतात प्रत्येकाला एकाच मताचा अधिकार दिला आहे. मतदान न करणे अतिशय दुर्दैवी असून मतदान करून लोकशाही प्रक्रियेत सहभागी होणे हे आपले कर्तव्य आहे. आता वर्षातून चार वेळा मतदार नोंदणी करता येते.उपजिल्हा निवडणूक अधिकारी शुभम दांडेकर म्हणाले, निवडणुका ह्या लोकशाहीचा अविभाज्य घटक आहे. मुक्त आणि निःपक्ष वातावरणात पारदर्शकपणे निवडणुका घेण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोग ही स्वतंत्र यंत्रणा अस्तित्वात आहे. संविधान सभेत 'मतदानाचा सार्वत्रिक अधिकार' या कलमावर सर्वांचेच एकमत झाले होते. त्यामुळे देशाच्या उज्वल भविष्यासाठी मतदार नोंदणी करा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार विजय पवार यांनी केले. संचालन सपना पिंपळकर यांनी तर आभार उपजिल्हा निवडणूक अधिकारी शुभम दांडेकर यांनी मानले. यावेळी मोठ्या संख्येने केंद्रस्तरीय, ब्लॉकस्तरीय निवडणूक अधिकारी, विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना मतदार दिनाची शपथ देण्यात आली.

## नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती उत्साहात साजरी

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.२३ :** भारतीय जनता पार्टी चंद्रपूर शहर महानगरच्या कार्यालयात आज महान स्वातंर्त्यसैनिक नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी नेताजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. नेताजींच्या राष्ट्रभक्तीचा आदर्श आत्मसात करण्याचे आवाहण यावेळी बोलतांना आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

या प्रसंगी भारतीय जनता पक्षाचे महामंत्री नामदेव डाहुले, विधानसभा अध्यक्ष दशरथसिंह ठाकुर, महिला आघाडी महामंत्री सायली येरणे, बहुजन महिला आघाडी अध्यक्ष विमल कातकर, प्रा. श्याम हेडाउ, रामकुमार आकापल्लीवार, कल्पना शिंदे, अल्का मेश्राम, वंदना हजारे, रष्मी पांडे, संजय महाकालीवार, रेणुका येरणे, भाग्यश्री येरणे, छाया चवरे, शालीनी राउत, लिना साखरकर, बादल हजारे आदिंची उपस्थिती होती.

कार्यक्रमात बोलताना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले की, नेताजी सुभाषचंद्र बोस हे केवळ स्वातंर्त्यसैनिक नव्हते, तर ते देशाच्या स्वाभिमानाचे प्रतीक होते. 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हें आजादी दूँगा' हा त्यांचा नारा आजही प्रत्येक भारतीयाच्या अंगात स्फुरण चढवतो, नेताजींनी स्थापन केलेली आजाद हिंद सेना ही भारतीय स्वातंर्त्यलढ्याच्या इतिहासातील क्रांतिकारक पर्वाची साक्ष आहे. त्यांच्या धैर्याने, शिस्तीने आणि राष्ट्रभक्तीने प्रेरणा घेऊन आजच्या पिढीने देशसेवा, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रउभारणीसाठी पुढे यावे, असे आवाहन आमदार जोरगेवार यांनी केले.

# शहरातील ज्वलंत पाणी समस्येवर त्वरीत बैठक घेण्यात यावी

## निवेदनातुन विरोधकांची मागणी



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

सिंदी (रेल्वे) , दि. २३

मागील १० ते १५ वर्षापासुन निर्माण झालेली पाणी समस्या आज जटील बनली असुन पालीकेतील विरोधी पक्षांच्या सिंदी शहर विकास आघाडी गटांने या समस्येवर चर्चा करण्यासाठी ताबडतोब बैठक बोलवून पाणी समस्येवर तोडगा काढण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली. सत्ताधारी गटाला कोंडीत पकडण्याचे आपले इरादे स्पष्ट केले आहे.

शहरात पालीकेव्दारे करण्यात येणारा पाणीपुरवठा चार ते पाच दिवसांवर गेला आहे.एवढेच काय तर शहरातील रेल्वे स्टेशन,नदी पलीकडील नगरसेवक बोरकर यांचा वार्ड, कथलकर यांच्या वार्ड क्रमांक १० मधे पाणीपुरवठा कमी प्रमाणात होतो.तर शहराच्या काही भागात गढुळ आणि अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्याचे सांगीत या ज्वलंत समस्येवर पालीकेच्या बैठकीत चर्चा करुन शिघ्र उपायोजना करण्यासाठी ताबडतोब महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ८१ (१) अ व २ मधील तरतुदीनुसार बैठक बोलविण्याची मागणी निवेदनातुन पालीकेतील विरोधी पक्षांच्या सिंदी शहर विकास आघाडीचे गटनेता अजय कलोडे यांनी सर्व विरोधी नगरसेवकांच्या स्वाक्षरीने नगराध्यक्षा राणी कलोडे यांना केली आहे.

आज झालेल्या विषय समीतीच्या गठणानंतर लागलीच शहरातील मुख्य आणि जटील झालेल्या पाणीपुरवठा समस्येला हात घालीत सत्ताधारी गटाला कोंडीत पकडण्याचे आपले इरादे विरोधी गटाने स्पष्ट केले आहे.निवेदनाच्या प्रतीलीपी खासदार अमर काळे, आमदार समीर कुणावार, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्याधिका-यांना देण्यात आल्या. निवेदन देताना गटनेता नगरसेवक अजय कलोडे, आशिष देवतळे,तुषार हिंगणेकर,सुरज कोपरकर, जगदीश बोरकर,वर्षा बोंबले, ज्योत्स्ना तडस,दुर्गा बेलखोडे,जयश्री मडावी तसेच स्विकृत नगरसेवक गंगाधर कलोडे आदींची उपस्थिती होती.

## मालवाहूला धडक, एक ठार

**वर्धा,** : टिप्पर चालकाने मालवाहूला जबर धडक दिली, यात मालवाहू वाहनात बसून असलेल्या एकाचा मृत्यू झाला तर एक जण जखमी झाला, हा अपघात वडनेर ते सिरसगावकडे जाणाऱ्या रस्त्यावर झाला, दिवाकर रामाजी वांदिले (४० रा. अल्लीपूर) असे मृतकाचे नाव आहे, तर हिमांशू कैलास हुल्के (२४ रा. अल्लीपूर) असे जखमीचे नाव आहे, हिमांशू एम. एच. ४८ एवाय. ८०५४ क्रमांकाच्या मालवाहूने वडनेर वरुन अल्लीपूरला परत जात होते, दरम्यान, टिप्पर चालक प्रशांत सुरेश हिवरकर रा. सोनेगाव स्टेशन याने ताब्यातील टिप्पर निष्काळजीपणे चालवून मालवाहूला धडक दिली, यात हिमांशूच्या बाजूला बसलेल्या दिवाकर केबीनमध्ये फसल्याने त्याचा मृत्यू झाला.

# हिंदी विवित उल्लास नवभारत साक्षरतातंर्गम राष्ट्रीय अभिमुखीकरण कार्यक्रम आज

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा,दि. २३

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात राष्ट्रीय साक्षरता केंद्र प्रकोष्ठ, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद आणि महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने २४ जानेवारी रोजी विश्वविद्यालयाच्या कस्तुरबा सभागृहात अध्यापक शिक्षण संस्थांसाठी 'उल्लास – नव भारत साक्षरता' अंतर्गत राष्ट्रीय अभिमुखीकरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

सकाळी ०९ वाजता सुरू होणाऱ्या या कार्यक्रमात आर.आय.ई. भोपाळचे सहायक प्रोफेसर डॉ. पवन कुमार 'उल्लास' योजनेच्या अंमलबजावणीत अध्यापक शिक्षण संस्थांची भूमिका या विषयावर, आंबेडकर विश्वविद्यालय, दिल्लीचे सहायक प्रोफेसर डॉ. ऋषभ मिश्रा 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि समुदाय सहभागातून विकसित भारताचे उद्दिष्ट बळकट करण्यात शैक्षणिक संस्थांची भूमिका' या विषयावर, एससीईआरटी महाराष्ट्राचे संचालक राहुल रेखावर 'अध्यापक शिक्षण संस्थांसाठी उल्लास : पुढील वाटचाल' या विषयावर, तर महाराष्ट्र शासनाचे संचालक (नियोजन) के. व्ही. पाटील उद्घाटन सत्रात 'महाराष्ट्र राज्यातील उल्लास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची स्थिती' या विषयावर आपले विचार मांडतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. गोपाल कृष्ण ठाकूर करतील. स्वागत भाषण शिक्षण विभागाचे सहायक प्रोफेसर डॉ. समरजीत यादव करतील तर आभार डॉ. अलका योगी मानतील. द्वितीय सत्रात राष्ट्रीय साक्षरता केंद्र प्रकोष्ठाच्या सल्लागार ज्योती तिवारी 'उल्लास – नव भारत साक्षरता कार्यक्रम आणि अध्यापक शिक्षण संस्थांमधील सामाजिक चेतना केंद्रे' या विषयावर मार्गदर्शन करतील. दुपारी १२:३० वाजता आंबेडकर विश्वविद्यालय, दिल्लीचे सहायक प्रोफेसर डॉ. ऋषभ मिश्रा 'उल्लास अंतर्गत टीईआयएसची भूमिका व जबाबदाऱ्या' या विषयावर, राष्ट्रीय साक्षरता केंद्र प्रकोष्ठ, नवी दिल्लीच्या वरिष्ठ सल्लागार डॉ. अलका योगी एनसीईआरटी संकेत स्थळावरील शिक्षार्थी व स्वयंसेवी शिक्षकांसाठी उपलब्ध संसाधन सामग्रीवर, राष्ट्रीय साक्षरता केंद्र प्रकोष्ठाच्या सल्लागार ज्योती तिवारी 'उल्लास अ?प'वर, तसेच राष्ट्रीय साक्षरता केंद्र प्रकोष्ठ, नवी दिल्लीचे सल्लागार डॉ. सियाराम मीणा 'आधारभूत साक्षरता व संख्यात्मकता' या विषयावर संबोधित करतील.

# मांडगाव ग्रामपंचायतीचा वीज पुरवठा खंडित

## पथदिवे बंद ; बाजाराच्या दिवशी गाव अंधारात

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

मांडगाव, दि. २३

स्थानिक मांडगाव ग्रामपंचायतीचे पथदिव्यांचे वीजबिल थकीत राहिल्याने महावितरणकडून ग्रामपंचायतीचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे, त्यामुळे संपूर्ण गावातील पथदिवे बंद असून विशेषत: बाजाराच्या दिवशी गाव अंध:कारमय झाले आहे.

माहितीनुसार, मांडगाव ग्रामपंचायतीकडे स्ट्रीट लाईटचे १२९ दिवसांचे वीजबिल थकीत आहे, त्याची रक्कम ६ लाख ३२ हजार ९२६ रुपये इतकी आहे, बिल न भरल्याने अखेर वीज पुरवठा बंद करण्यात आला, यामुळे संपूर्ण गावात अंधार पसरला असून नागरिकांना मोठया अडचणींचा सामना करावा लागत आहे, या संदर्भात माहिती घेतली असता, दरवर्षी स्ट्रीट लाईटचे वीजबिल जिल्हा परिषदेकडील विशेष निधीतून भरले जाते, यंदा जिल्हा परिषदेकडून निधी उपलब्ध न बिल भरणे शक्य झाले नाही, असे सांगण्यात आले, महावितरणच्या अभियंत्यांनी यापूर्वी अनेकदा सूचना व पत्रव्यवहार करूनही सूचना व पत्र व्यवहार करुनही ग्रामपंचायतीकडून प्रतिसाद न मिळाल्याने वरिष्ठांच्या आदेशानुसार वीज पुरवठा खंडित केल्याचे स्पष्ट केले, थकीत वीजबिल तातडीने भरुन गावातील पथदिवे सुरू करावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते हेमंत पाहुणे, अनिल आडकिने यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे.

# जुगा-यांवर कारवाई, तीन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

हिंगणघाट,दि. २३

पोलिसांनी जुगार खेळणाऱ्यांवर कारवाई करीत तीन लाख १४ हजार तीनशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वडनेर पोलिसांनी फुकटा शिवारात ही कारवाई केली. तालुक्यातील फुकटा शिवारात जुगार सुरू असल्याची माहिती वडनेर पोलिसांना मिळाली.

माहितीच्या आधारे पोलिसांनी घटनास्थळ गाठून जुगार खेळत असलेल्या आरोपी धनराज बावणे फुकटा, सागर जवंजाळ वडनेर, विजेंद्रसिंग जुनी वडनेर,अजय पवार फुकटा, विनोद देवतळे फुकटा,नयन वरघणे फुकटा , अजय उमाटे फुकटा यांचेवर कारवाई करून पत्तेसह तीन लाख १४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला. ही कारवाई ठाणेदार घनश्याम पाटील यांच्या नेतृत्वात बीट जमादार जितेंद्र वैद्य, संदीप बदकी यांनी केली.

## शासनमान्य ग्रंथ निवड यादीसाठी ग्रंथ सादर करण्याचे आवाहन

**वर्धा, :** राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान कोलकाता व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने समान निधी ग्रंथभेट योजनेंतर्गत सन २०२५ या वर्षात प्रकाशित झालेली मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील ग्रंथ खरेदी करुन राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांना भेट म्हणून देण्यात येतात. यासाठी ग्रंथाची निवड यादी तयार करण्यासाठी ग्रंथाची एक प्रत विनामुल्य सादर करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

योजनेंतर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या ग्रंथाची निवड करण्यासाठी तसेच ग्रंथालय संचालनालय स्तरावरुन प्रसिध्द होणा-या शासनमान्य ग्रंथ निवड यादी मध्ये समावेश होण्याच्या दृष्टीने सन २०२५ या कॅलेंडर वर्षात प्रकाशित झालेल्या व प्रथम आवृत्ती असलेल्या ग्रंथाची प्रत्येकी एक विनामुल्य प्रत ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुबंई यांच्याकडे २८ फेब्रुवारी पर्यत सादर करणे आवश्यक आहे. नमुद तारखेनंतर प्राप्त झालेल्या ग्रंथाचा ग्रंथ निवड यादीसाठी विचार केला जाणार नाही. सन २०२५ या वर्षात प्रकाशित झालेले ग्रंथ जर यापुर्वी संचालनालयास पाठविले असल्यास पुन्हा पाठविण्याची आवश्यकता नाही. तसेच मुद्रण व नोंदणी अधिनियम १८६७ अन्वये मुद्रकाने व ग्रंथ प्रदान अधिनियम १९५४ अन्वये प्रकाशकाने सदर ग्रंथाची प्रत्येकी एक प्रत राज्य राज्य मध्यवर्ती ग्रंथालय नगर भवन मुबंई शासकीय विभागीय ग्रंथालय पुणे व शासकीय विभागीय ग्रंथालय नागपूर येथे पाठविणे आवश्यक आहे. सदर ग्रंथ संबंधित ग्रंथ संचालनालयांना पाठवितांना ग्रंथ पाठविल्याची पोच पावती ग्रंथासोबत टपालामार्फत वा समक्ष पाठविण्यात यावी, असे प्रभारी ग्रंथालय संचालकांनी कळविले आहे.

# एनसीसी प्रशिक्षणातून सैनिकी व्यक्तिमत्व विकसित होते- कर्नल जीसांतो




■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

देवळी, दि. २३

एनसीसी ही सैन्य दलाची दुसरी फळी असून यातून तरुण-तरुणींमध्ये देशभक्ती, कर्तव्यनिष्ठता, जागरूकता व नैतिक मूल्याच्या विकास घडवून आणला जातो. एन सी सी च्या विविध प्रशिक्षणातून तथा शिबिरातून सैनिकी मानसिकता तयार केली जाते. देशाच्या सुरक्षेकरिता सैनिकी मानसिकता असणे गरजेचे आहे. म्हणजेच एनसीसी प्रशिक्षणातून सैनिकी व्यक्तिमत्व विकसित होते', असे प्रतिपादन २१ महाराष्ट्र बटालियन एनसीसी चे कमान अधिकारी कर्नल जीसांतो यांनी केले.

स्थानिक एस एस एन जे महाविद्यालयाच्या १५ व्या एनसीसी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे शेवटचे सरसेनापती नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १२९ व्या जन्मदिनानिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षीही स्थानिक एस एस एन जे महाविद्यालयाचा एनसीसी दिवस साजरा झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उद्योजक मोहन अग्रवाल तर प्रमुख अतिथीम्हणून कर्नल जीसांतो, निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे, ठाणेदार अमोल मांडलकर, माजी एनसीसी अधिकारी कॅप्टन दिलीप ठोंबरे, डॉ. श्रद्धा चौरे, प्राचार्य डॉ. सुनिता सोनारे,उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला नेताजी सुभाषचंद्र बोस व स्व. बापूराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी एनसीसी छात्र सैनिकांनी सेरेमोनियल परेड सादर केली. लोकनृत्य समीक्षा नेवारे व कल्याणी लिखार यांनी सादर केले.चित्रकला स्पर्धेत सृजनचीवंशिका पारिसे, गुरुकुलची स्वरा अलोणे व सुजनची श्रेया तेलरांधे यांना अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय पारितोषिक देण्यात आली. 'पर्यावरण संवर्धन: या विषयावर सृष्टी ठाकरे, रचना अमबहारे व मृणाल चौधरी यांना तर महाविद्यालयीन गटांकरिता स्वाती खोड ,प्राची उईके व श्रद्धा मानले यांना अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय पारितोषिके देण्यात आली. प्रत्येक गटात दहा प्रोत्साहनपर पुरस्कार देऊन ३० विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे संचालन कोमल शितळे हिने केले आभार कॅप्टन मोहन गुजरकर यांनी मानले. यशस्वीते करिता सुजल पराते, निशांत शितळे, उदय काळे, युवराज डफरे, पुनम डांगरे, पायल चौके, वैष्णवी कन्नाके यांच्यासह एनसीसी छात्र सैनिकांनी अथक परिश्रम केले. कार्यक्रमाची सांगता 'हम सब भारतीय है.........' या एनसीसी गीताने झाली.

### सन्मानचिन्ह तसेच पदक देत सन्मानित

यावेळी एनसीसी विभागातर्फे मोहन अग्रवाल, माजी एनसीसी अधिकारी कॅप्टन दिलीप ठोंबरे व डॉ.श्रद्धा चौरे यांना 'एनसीसी सन्मानचिन्ह' देऊन गौरविण्यात आले.पत्रकार दिनानिमित्त देवळी तालुका प्रतिनिधी सत्तार शेख, समीर शेख, गणेश शेंडे, संतोष तुरक ,अजिज शेख व सचिन वैद्य यांना 'एनसीसी सन्मानचिन्ह' प्रदान करण्यात आले. स्काऊटचे जिल्हा संघटक नितेश झाडे व रोव्हर लीडर संतोष तुरक यांना राष्ट्रीय चषक देऊन सन्मानित करण्यात आले. अंडर ऑफिसर आदर्श नाईक व मनोज नेहारे यांना दिल्लीत झालेल्या डायमंड जुबली शिबिराचे चषक प्रदान करण्यात आले.

# मिर्झापुर नेरी ग्राम विकासाचे परिपूर्ण मॉडेल - जिल्हाधिकारी वान्मथी सी

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा,दि. २३

जिल्ह्यातील आर्वी पंचायत समिती अंतर्गत येणारे मिर्झापूर नेरी हे गाव ग्राम विकासाच्या प्रवासात जिद्दीने आणि कष्टाने उभे राहिलेले गाव असून ग्राम विकासाचे परिपूर्ण आणि उत्कृष्ट मॉडेल असून जिल्ह्यातील इतर गावांनी ही प्रेरणा घेऊन गावाच्या विकासात्मक निर्मितीचा विचार घेतला पाहिजे असा संदेश जिल्हाधिकारी वानमथी सी. यांनी दिला.



मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना अंतर्गत मिर्झापूर नेरी येथे क्षेत्रीय भेटी दरम्यान जिल्हाधिकारी यांनी संपूर्ण गावाला फेरफटका मारून ग्रामविकासाची संपूर्ण माहिती जाणुन घेतली. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, अंगणवाडी,नथोपंत सोनटक्के गुरुजी स्मृती वाचनालय, वृद्ध नागरिकांसाठी आठवणींचा विसावा , श्री गुरुदेव सामुदायिक प्रार्थना मंदिर, नालंदा बौद्ध विहार इत्यादी स्थळांना भेटी दिल्यानंतर जिल्हाधिकारी वानमथी सी. यांनी रात्रीच्या दैनंदिन श्रमदानाबाबत ग्रामवसियांच्या मेहनतीचे आणि जिद्दीचे भरभरून कौतुक करत शुभेच्या दिल्या.मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत नाविन्यपूर्ण उपक्रमातून भव्य हळदीकुंकू व ग्रामगीतेचे वान वाटप कार्यक्रमांमध्ये सहभागी महिलांना जिल्हाधिकारी वानमतीशी यांनी स्वतः ग्रामगीतेच्या वाणाचे वाटप केले. याप्रसंगी आयोजित समारोपीय कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट तहसीलदार काळे गटविकास अधिकारी प्रदिप चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती मिर्झापूर नेरी च्या गाथेचा थोडक्यात इतिहास सरपंच बाळा सोनटक्के यांनी प्रास्ताविकातून मांडला.कार्यक्रमाचे संचालन ग्रामपंचायत अधिकारी संजय यावले यांनी तर आभार ग्राम महसूल अधिकारी नवज्योत जामनिक यांनी मानले.

**जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांशी साधला संवाद.....**

जिल्हाधिकारी वानमथी सी.यांनी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना विशेष विशेष मार्गदर्शन करत दिलखुलास संवाद साधला.

**मी कोण आहे ?.** जिल्हाधिकारी यांनी केलेल्या या प्रश्नावर उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी मॅडम असे उत्तर देताच जिल्हाधिकाऱ्यांनी आश्चर्य व्यक्त करीत शाळेचे मुख्याध्यापक मंगेश कोल्हे व सहायक शिक्षक कहारे यांचे भरभरून कौतुक केले. खूप अभ्यास करा .आई-वडिलांचे गावाचे व समाजाचे नाव मोठे करा असा सल्ला विद्यार्थ्यांना जिल्हाधिकाऱ्यांनी दिला गावातील नागरिकांचा उत्साह आणि सरपंच बाळा सोनटक्के यांच्या नेतृत्वात गावाची होणारी प्रगती पाहून जिल्हाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. जिल्हाधिकाऱ्यांच्या गाव भेटीदरम्यान श्री गुरुदेव सेवा मंडळाचे कार्यकर्ते, महिला बचत गटाच्या सर्व सदस्या, गावातील महिला पुरुष आणि स्थानिक पातळीवरचे सर्व कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

# शहरात तीन दिवसीय स्वच्छता अभियानाचा शुभारंभ

## नगर परिषदद्वारा स्तुतीप्रिय उपक्रम

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा, दि. २३

२६ जानेवारी रोजी गणराज्य दिवस उत्साहात साजरा केला जाणार आहे. सामाजिक दायित्वाची किनार देत उत्सवाचा आनंद अधिक द्विगुणित व्हावा याकरिता 'माझं शहर माझी जबाबदारी' या नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांच्या संकल्पनेतून २२, २३, २४ जानेवारी रोजी स्वच्छता अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी विविध सामाजिक संघटना व जन सहभागातून शहरातील मुख्य रस्त्यांची साफ सफाई मोहिम राबविण्यात येत आहे.



'माझं शहर माझी जबाबदारी' या संकल्पनेतून सोबतच २६ जानेवारीचे औचित्य साधून महात्मा गांधी यांच्या विचाराला अनुसरून स्वच्छता अभियानाचा शुभारंभ गुरुवार ता. २२ रोजी करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बजाज चौकापर्यंत मार्गाची सफाई करण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याची स्वच्छता करण्यात आली. त्यानंतर मार्गाची स्वच्छता तसेच स्वातंत्र्य सेनानी जमनालाल बजाज यांच्या पुतळ्याची स्वच्छता करीत अभियानाचा समापन करण्यात आला. यावेळी शहरातील विविध सामाजिक संघटनांसह नागरिकांनी सहभाग घेतला होता. खासकरून युवक युवतींनी सहभाग घेत नागरिकांना स्वच्छते संदर्भात जागरूक केले.

शुक्रवार २३ रोजी बजाज चौक ते झाशी राणी चौक पर्यंत मार्गाची सफाई अभियान करण्यात येणार आहे. शनिवार २४ रोजी सुद्धा सफाई अभियान राबविण्यात येणार असून शहरातील संपूर्ण महापुरुषांचे पुतळे तसेच मार्गाची सफाई करण्यात येणार आहे. हे अभियान नगर परिषदद्वारे राबविण्यात येत असून या अभियानात मुख्याधिकारी, सभापती तसेच सर्व नगरसेवकांचा समावेश आहे. सर्व नगरसेवक आपल्या वार्डात जनसहभागातून सफाई अभियान राबवित आहे. या अभियानाला यशस्वी करण्याकरिता नागरिकांचा, विविध सामाजिक संघटनांचा तसेच नगर परिषदेतील सर्व नगरसेवक, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी परिश्रम घेत आहे. नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, मुख्याधिकारी यांनी सर्व जनसामान्य, सामाजिक संघटना या उपक्रमात सहभागी होण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे.

